**कृषि उन्नती योजना - राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत सन २०१९-२० मध्ये भात पड क्षेत्रामध्ये गळीतधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी (TRFA- Oilseed) कार्यक्रमास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : रागते-१०१९/प्र.क्र.८७/४-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०७ नोव्हेंबर, २०१९

संदर्भ:-

१. केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र F.No.४-१/२०१९-२०/NFSM (OS & OP)/C.No. ६८१६७, दि. २६ जून, २०१९
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र. अेअेपी-२०१९/प्र.क्र.४०/४-अे,दि.०८ जुलै, २०१९
३. केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र F.No.२-२९/२०१९-NFSM-OS, दि.२३ ऑगस्ट, २०१९
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र.Extn.२/NFSM(OS)/AAP१९-२०/TRFA-Oil/१३७/१९, दि.५ ऑक्टोबर, २०१९
५. केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र F.No.२-२९/२०१९-NFSM-OS, दि. १७ ऑक्टोबर,२०१९
६. केंद्रीय कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र F.No.२-२९/२०१९-NFSM-OS, दि. १८ ऑक्टोबर,२०१९
७. कृषि आयुक्तालयाचा प्रस्ताव जा.क्र.विप्र२/राअसुअ-गळीत/भात पड क्षे./प्र.मा.प्र/प्र.क्र.१२/३९९७ /१९, दि. १९ ऑक्टोबर,२०१९

प्रस्तावना :-

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (गळीतधान्य व तेलताड) अंतर्गत गळीतधान्य पिकांच्या क्षेत्रात वृद्धी करणे, उत्पादकतेत वाढ करणे, शेत जमिनीची सुपीकता वाढविणे, रोजगारांची संधी निर्माण करणे व शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ करणे हे या अभियानाचे प्रमुख उदिष्ट आहे.

केंद्र शासनाने सन २०१९-२० मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत (गळीतधान्य व तेलताड) अभियान राबविण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील दि.२६ जून, २०१९ च्या पत्रान्वये रु.५२७२.८६ लाख (केंद्र हिस्सा रु.३१६६.६० लाख व राज्य हिस्सा रु.२१०६.२७ लाख) एवढया रकमेचा वार्षिक कृती आराखडा मंजूर केला आहे. सदर रकमेच्या कार्यक्रमास संदर्भ क्र.२ येथील दि.०८ जुलै, २०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय कृषि परिषदेच्या शिफारसीनुसार सन २०१६-१७ पासून देशातील पूर्वीय ६ राज्यात राबविण्यात येत असलेला “भात पड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन वाढविण्यासाठी कार्यक्रम-TRFA Oilseed” सन २०१९-२० पासून महाराष्ट्र राज्यासह इतर ४ राज्यात राबविण्यात येणार असल्याचे केंद्र शासनाने संदर्भ क्र.३ येथील दि. २३ ऑगस्ट, २०१९ च्या पत्रानुसार निर्देशित केले होते. त्यानुसार कृषि आयुक्तालयाने TRFA-Oilseeds साठी संदर्भ क्र.४ येथील दि.५ ऑक्टोबर, २०१९ च्या पत्रानुसार प्रस्तावित केलेल्या रु. १०८.७१ लाख रकमेच्या वार्षिक कृति आराखड्यास केंद्र शासनाने संदर्भ क्र.५ येथील दि. १७ ऑक्टोबर, २०१९ च्या पत्रानुसार मंजुरी प्रदान केली आहे. त्यानुषंगाने भात पड क्षेत्रामध्ये गळीतधान्य उत्पादन वाढविण्याचा कार्यक्रम राज्यात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णयः**

१. सन २०१९-२० करिता कृषि उन्नती योजनेंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा ( तेलबिया व वृक्षजन्य तेलबिया) अभियान अंतर्गत ₹ १०८.७१ लक्ष (केंद्र हिस्सा ₹ ६५.२२ लक्ष + राज्य हिस्सा ₹ ४३.४९ लक्ष) रकमेच्या भात पड क्षेत्रामध्ये गळीतधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठीच्या (TRFA- Oilseeds) कार्यक्रमास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

i. सदर कार्यक्रम राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाच्या मार्गदर्शक सूचनानुसार कार्यक्रम राबविण्यात यावा.

ii. या कार्यक्रमांतर्गत वापरले जाणारे वाण १० वर्षाच्या आतील असावेत.

iii. या कार्यक्रमाअंतर्गत घेतली जाणारी प्रात्यक्षिके आय.सी.ए.आर.(ICAR) किंवा कृषि विद्यापिठाने (SAU) शिफारस केलेली असावीत.

iv. सदर प्रात्यक्षिकांचे १०० टक्के जिओ टॅगींग (Geo Tagging) करण्यात येईल व त्याची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांची असेल.

२. सदर कार्यक्रमाचे घटक/उपघटक निहाय मंजूर आर्थिक व भौतिक लक्षांकाचे वितरण सोबतच्या परिशिष्ट “अ” मध्ये नमूद केले आहे. सदर अभियानाची केंद्र व राज्याच्या ६०:४० आर्थिक सहभागाच्या प्रमाणात अंमलबजावणी करण्यात यावी.

३. सदर अभियानाच्या अंमलबजावणीकरीता केंद्र व राज्य हिस्स्याचा निधी ६०:४० प्रमाणात वेळोवेळी अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीद्वारे कृषि आयुक्तालयास उपलब्ध करून देण्यात येईल. सदर निधी केंद्र व राज्य हिस्स्याच्या पुढील लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकण्यात यावा.

| अ. क्र. | प्रवर्ग | मागणी क्र. | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (केंद्र हिस्सा) | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (राज्य हिस्सा) |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण | D-३ | २४०१ ४६१४ | २४०१A२३४ |
| २ | अनुसूचित जाती | D-३ | २४०१A१६३ | २४०१ A१७२ |
| ३ | अनुसूचित जमाती | T-५ | २४०१ A५७७ | २४०१A५६६ |

४. सन २०१९-२० मध्ये राज्यात सदर अभियानाची अमंलबजावणी व सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने निधी आहरण व वितरण करणेसाठी पुढीलप्रमाणे नियंत्रण तसेच आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्तर | नियंत्रण अधिकारी | आहरण व संवितरण आधिकारी |
|---|---|---|---|
| १ | आयुक्तालय स्तर | आयुक्त (कृषि), कृषी आयुक्तालय, पुणे | सहाय्यक संचालक (लेखा-१) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे. |
| २ | जिल्हा स्तर | संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी | संबंधित जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालयातील लेखाधिकारी |

४. केंद्र शासनाचे निर्देशानुसार सदर ₹१०८.७१ लक्ष रकमेच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९११०७१५१५४८५९०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KIRAN N PATIL

Digitally signed by KIRAN N PATIL
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=657661007c4f6885bf8deae62f13606632589e592d8c18ceb9a49bfd30471850, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=64a3950913946fa68fe576faead463fd8ae1e3844a820d921b663674927a476e, ou=AGRICULTURE DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KIRAN N PATIL
Date: 2019.11.07 15:19:02 +05'30'

**( डॉ. किरण पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२. मा. राज्य मंत्री (कृषि) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
९. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
११. संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१२. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१३. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१४. महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१५. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर

१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१८. सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१९. वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
२०. निवड नस्ती.

## परिशिष्ट - अ

## सन २०१९-२० करिता राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत भात पड क्षेत्रामध्ये गळीतधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी (TRFA- Oilseed) कार्यक्रम

| अ.क्र. | बाब/घटक | परिमाण | मंजूर कार्यक्रम | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | भौतिक | आर्थिक | | |
| | | | | केंद्र हिस्सा | राज्य हिस्सा | एकूण |
| अ) | समुह गटप्रात्यक्षिके @२.५० लाख/गाव | | | | | |
| १) | मोहरी | रु.३०००/हे. | ११० | १.९८ | १.३२ | ३.३० |
| २) | जवस | | ५२० | ९.३६ | ६.२४ | १५.६० |
| ३) | तीळ | | १०० | १.८० | १.२० | ३.०० |
| ४) | करडई | | २८० | ५.०४ | ३.३६ | ८.४० |
| ५) | भुईमुग | रु.१००००/हे. | ४४० | २६.४० | १७.६० | ४४.०० |
| **एकूण ....(अ)** | | --- | **१४५०** | **४४.५८** | **२९.७२** | **७४.३०** |
| ब) | एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन | | | | | |
| १) | सूक्ष्म मूलद्रव्ये | रु.५००/हे. | ५०० | १.५० | १.०० | २.५० |
| २) | जिप्सम | रु.७५०/हे. | ३०० | १.३५ | ०.९० | २.२५ |
| ३) | जैविक खते | रु.५००/हे. | ८१० | २.४३ | १.६२ | ४.०५ |
| ४) | जैविक कीटकनाशके (Pesticide) | रु.५००/हे. | ६०० | १.८० | १.२० | ३.०० |
| ५) | स्प्रिंकलर | PMKSY प्रमाणे | २० | १.७२ | १.१५ | २.८७ |
| ६) | पाईप्सचा पुरवठा | NFSM प्रमाणे | ६१०० | १.८३ | १.२२ | ३.०५ |
| (७) | कृषि औजारे | SMAM प्रमाणे | ---- | ---- | ---- | ---- |
| i) | सीड ड्रील | | ५ | ०.६० | ०.४० | १.०० |
| ii) | रोटाव्हेटर | | ५ | १.३५ | ०.९० | २.२५ |
| **एकुण ....(ब)** | | ---- | ---- | **१२.५८** | **८.३९** | **२०.९७** |
| क) | प्रशिक्षण | | | | | |
| १) | शेतकरी प्रशिक्षण | रु. ०.२४ लाख/प्र. | ५० | ७.२० | ४.८० | १२.०० |
| २) | अधिकारी प्रशिक्षण | रु. ०.३६ लाख/प्र. | ४ | ०.८६ | ०.५८ | १.४४ |
| **एकूण ....(क)** | | ---- | **५४** | **८.०६** | **५.३८** | **१३.४४** |
| **एकूण एकंदर ...(अ+ब+क)** | | | ---- | **६५.२२** | **४३.४९** | **१०८.७१** |